RNI No. MAHBIL/2012/46121

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ५, अंक ६०(३)] सोमवार, डिसेंबर १६, २०१९/अग्रहायण २५, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ८९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**

**पोट-निवडणूक जानेवारी २०२०**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे अनुसूची प्रकरण १ (१९४९ चा मुंबई ५९)

**अधिसूचना**

क्रमांक मामनपा/निवडणूक/५०१/२०१९

मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२०१९/प्र.क्र.९/का-५, दिनांक ९ डिसेंबर २०१९ अन्वये मालेगाव महानगरपालिकेच्या पोट-निवडणूक जानेवारी, २०२० करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार मी किशोर बोर्डे, आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव या जाहीर प्रकटनाद्वारे मालेगाव महानगरपालिका, पोट-निवडणूक जानेवारी २०२० चा खालीलप्रमाणे नमूद केलेला कार्यक्रम जाहीर करीत आहे :—

**परिशिष्ट**

| अ.क्र. (१) | निवडणुकीचा टप्पा (२) | दिनांक (३) |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची तारीख. | दिनांक १६ डिसेंबर २०१९ (सोमवार). |
| २ | नामनिर्देशन पत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा कालावधी. | दिनांक १६ डिसेंबर २०१९ (सोमवार) सकाळी ११-०० ते दिनांक २३ डिसेंबर २०१९ (सोमवार) दुपारी २-०० पर्यंत. |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचा कालावधी | दिनांक १६ डिसेंबर २०१९ (सोमवार) ते दिनांक २३ डिसेंबर २०१९ (सोमवार) (सकाळी ११-०० ते दुपारी ३-००) (दिनांक २२ डिसेंबर २०१९ रोजी नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार नाहीत). |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दिनांक २४ डिसेंबर २०१९ (मंगळवार) (सकाळी ११-०० वाजल्यापासून). |

**परिशिष्ट**—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक. | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच. |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २६ डिसेंबर २०१९ (गुरुवार) (दुपारी ३-०० पर्यंत). |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दिनांक २७ डिसेंबर २०१९ (शुक्रवार) (सकाळी ११-०० वाजल्यापासून). |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक. | दिनांक २७ डिसेंबर २०१९ (शुक्रवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक ९ जानेवारी २०२० (गुरुवार) (सकाळी ७-३० ते संध्याकाळी ५-३० पर्यंत). |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दिनांक १० जानेवारी २०२० (शुक्रवार) (सकाळी १०-०० पासून). |
| ११ | निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे | दिनांक १३ जानेवारी २०२० (सोमवार) पर्यंत. |

तसेच मा. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांनी त्यांना महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१६/का-५, दिनांक १२ मार्च २०१५ नुसार प्राप्त अधिकारानुसार इकडील आदेश जा.क्र. मामनपा/आ.कार्या/५००/२०१९, दिनांक १३ डिसेंबर २०१९ अन्वये उपरोक्त निवडणूक कार्यक्रमानुसार जरूर ती कार्यवाही पार पाडण्यासाठी खालील तक्त्यातील रकाना (२) मधील अधिकारी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्रमांक (४) मधील प्रभागांकरिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.

| अ.क्र. (१) | निवडणूक निर्णय अधिकारी (२) | नामनिर्देशनपत्रांची स्वीकृती इत्यादी कार्यवाही करण्याचे ठिकाण (३) | सुपूर्द करण्यात आलेले प्रभाग (४) | एकूण प्रभाग (५) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. नितीन कापडणीस, उपायुक्त (प्रशासन), मालेगाव महानगरपालिका, मालेगाव. | प्रभाग कार्यालय क्र. ३, नवापुरा वार्ड, इस्हाक मुन्शी टाऊन हॉल जवळील शाळा इमारत. | १२ जागा (ड) | ०१ |

रकाना क्र.४ मधील संबंधित प्रभागाची नामनिर्देशनपत्र (Nomination Papers) कोणत्याही मतदाराने ऑनलाईन ४ (चार) फॉर्म म. राज्य निवडणूक आयोगाचे *http://panchayatelection.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर नामनिर्देशन पत्र भरावे व त्याची प्रिंट आऊट घेऊन त्यावर उमेदवार, सूचक व अनुमोदक यांची स्वक्षरी घेऊन नामनिर्देशनपत्र (Nomination Papers) निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडेस विहित दिनांक १६ डिसेंबर २०१९ ते दिनांक २३ डिसेंबर २०१९ (सकाळी ११-०० ते दुपारी २-००) वाजेपर्यंत त्यांचे संबंधित कार्यालयात स्वीकारतील (रविवार, दिनांक २२ डिसेंबर २०१९ रोजी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार नाहीत.)

उपरोक्त निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशनासंबंधी इतर सर्व कार्यवाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या वरील तक्त्यात नमूद रकाना क्र. (३) याठिकाणचे कार्यालयातच होईल.

**किशोर बोर्डे,**
आयुक्त,
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.

मालेगाव,
दिनांक १६ डिसेंबर २०१९.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.